## * ऋणनिर्देश *

प्रस्तुत शोध प्रबंध सादर करताना मला कर्तव्यपूर्तीचे समाधान होत आहे. या प्रबंधासाठी मी जरी प्रयत्न व परिश्रम केले असले तरी ते सार्थकी लावण्याचे सारे श्रेय माझे मार्गदर्शक डॉ. किशोर रा. कुलकर, अधिव्याख्याता, श्रीमती पुतळाबेन शाह कॉलेज ऑफ एज्युकेशन, सांगली यांनाच आहे. त्यांच्या समर्थ व सकस मार्गदर्शनामुळेच माझ्या प्रयत्नाला व परिश्रमाला योग्य दिशा व प्रेरणा मिळाली. दैनंदिन कामाचा व्याप सांभाळून वेळात वेळ काढून त्यांनी अगत्यपूर्वक मार्गदर्शन केले. माझ्या प्रयत्नाला संपूर्णपणे मार्गदर्शन, सहकार्य व सदिच्छा देणाऱ्या गुरुवर्यांची मी सदैव ऋणी राहीन. त्यांचे ऋण व्यक्त करण्यापेक्षा त्यांचा ऋणभार सांभाळणेच मला अधिक आवडेल.

संशोधनासाठी माहिती संकलन करण्याच्या हेतूने ज्या शाळांना भेटी दिल्या तेथील मुख्याध्यापक व अध्यापक यांनी तत्परतेने विनाविलंब या संशोधन कार्यासंदर्भात जो प्रतिसाद दिला त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. तसेच उत्साहाने प्रश्नावली भरून देणाऱ्या विद्यार्थ्यांनाही धन्यवाद।

संदर्भ ग्रंथ सूचीत निर्देश केलेल्या लेखकांच्या संदर्भ साहित्याचा या संशोधन कार्यासाठी खूपच उपयोग झाला. त्या सर्व लेखकांची मन:पूर्वक आभारी आहे.

सांगली येथील श्रीमती पुतळाबेन शाह कॉलेज ऑफ एज्युकेशन या महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापकवृंद यांच्या प्रेरणा व मार्गदर्शन वेळोवेळी लाभले, तसेच ग्रंथपाल सौ. अनुराधा प्र. उदगांवकर यांनी ग्रंथालयाचे सक्रिय सहकार्य केले याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार.

तासगांव येथील स्वामी विवेकानंद संस्थेच्या महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापकवृंद यांच्या सदिच्छा सदैव पाठीशी होत्या. तसेच ग्रंथपाल सौ. उमा राजोबा यांचे वेळोवेळी लाभलेले सक्रिय